# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** नागपूर महानगरपालिकेच्या मालकिचे बाजार विभागाचे
**{ मालमता विभाग }** व्यवस्थापनेअंतर्गत मंगळवारी कॉम्प्लेक्स येथील दुकान क्र. १७३ लोअर ग्राऊंड फलोअरचे ११ महिन्याचे अस्थायी परवानेधारक श्री. समिर कृष्णराव कावळे यांचेकडे सदर दुकानाचे वापर शुल्क थकित असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१-बी (३) अन्वये सदर दुकान महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये घेण्यात आलेल्या दुकानांना अभय योजनेचा लाभ लागु होणार नसुन वापर शुल्कासह १००% शास्ती वसुल करणे व मनपाच्या ताब्यात असलेले दुकान पुन:श्च परवानेधारकास दयावयाचे असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण एकोणवीसचे कलम ३३२ (ब) च्या तरतुदीन्वये, स्थायी समितीच्या मान्यतेने वर सांगितल्याप्रमाणे आकारणी योग्य असलेले दुकान-भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही, अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याचे देण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप** :-

१) सविस्तर टिप्पणी नस्तीस संलग्न.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३३२ (ब) ची प्रत नस्तीस संलग्न.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक** :- 250/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक** :- 28/08/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार **उपायुक्त** (**मालमत्ता**), **मालमत्ता** विभाग, मंगळवारी झोन क्र. १० यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकिचे बाजार विभागाचे व्यवस्थापनेअंतर्गत मंगळवारी कॉम्प्लेक्स येथील दुकान क्र. १७३ लोअर ग्राऊंड फलोअरचे ११ महिन्याचे अस्थायी परवानेधारक श्री. समिर कृष्णराव कावळे यांचेकडे सदर दुकानाचे वापर शुल्क थकित असल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ८१-बी (३) अन्वये सदर दुकान महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेले आहे.

महानगरपालिकेच्या ताब्यामध्ये घेण्यात आलेल्या दुकानांना अभय योजनेचा लाभ लागु होणार नसुन वापर शुल्कासह १००% शास्ती वसुल करणे व मनपाच्या ताब्यात असलेले दुकान पुन:श्च परवानेधारकास दयावयाचे असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण एकोणवीसचे कलम ३३२ (ब) च्या तरतुदीन्वये, स्थायी समितीच्या मान्यतेने वर सांगितल्याप्रमाणे आकारणी योग्य असलेले दुकान-भाडे, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एकावेळी एक वर्षापेक्षा अधिक होणार नाही, अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याचे देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.